# विलासराव देशमुख शासकिय वैद्यकिय महाविद्यालय व रुग्णालय, लातुर
## (अधिष्ठाता यांचे कार्यालय)
मारवाडी राजस्थान शाळेजवळ, गांधी चौक, लातुर

दुरध्वनी क्र. (०२३८२) २४७६७६ फॅक्स (२३८२ )२४९२९२मेल :- dean_gmchl@rediffmail.com


जा.क्र.विदेशावैमला/लले/कंत्राटी पदभरती/१८६८/२०२३ दि. १७ /०३/२०२३

# जाहिरात

## Walk in Interview

कर्मचारी संपकालीन परिस्थितीच्या अनुषंगाने विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, लातूर येथे खालील गट-क तांत्रिक व नर्सिंग पदे निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी पध्दतीने प्रत्यक्ष मुलाखतीव्दारे भरावयाची आहेत. मुलाखत दि.१९/०३/२०२३ रोजी सकाळी ११ वाजता अधिष्ठाता कार्यालय, विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, लातूर येथे घेण्यात येईल. उमेदवाराने अर्ज व सर्व शैक्षणिक कागदपत्रे व प्रमाणपत्रे (मुळ व एक नक्कल) मुलाखतीच्या वेळेस सादर करणे आवश्यक राहील. सदर पदभरती गुणव-तेनुसार करण्यात येईल.

| अ.क्र. | पदाचे नाव | शैक्षणिक अर्हता | ठोक मानधन | मुलाखतीची वेळ |
|---|---|---|---|---|
| १ | अधिपरीचारीका | बीएससी (नर्सिंग)/ जीएनएम | नियमानुसार | रविवार दि.१९.०३.२०२३ रोजी सकाळी ११:०० ते दुपारी ०३:०० वाजेपर्यंत |
| २ | प्रयोगशाळा सहायक | एच.एस.सी. (विज्ञान) भौतीकशास्त्र, रसायनशास्त्र किंवा जीवशास्त्रासह आणि बीएससी पॅरामेडीकल टेक्नॉलॉजी इन लेबॉरेटरी किंवा डिप्लोमा सर्टीफिकेट इन लेबॉरेटरी | नियमानुसार | |
| ३ | औषध निर्माता | एच.एस.सी. विज्ञान घेऊन उत्तीर्ण, बी फार्म / डी फार्म पदवी उत्तीर्ण. | नियमानुसार | |

**सदर पदभरती ही नर्सिंग व तंत्रज्ञ (प्रयोगशाळा व इतर) पदाकरिता असुन ही केवळ संस्थेतील रिक्त पदांकरिता आहे. यांचा नियमित अथवा अस्थायी रित्या भरलेल्या पदांशी कसलाही संबंध नाही.**

## अटी व शर्ती

१. सदर नियुक्ती ही निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी तत्वावर आदेशाच्या दिनांकापासून २९ दिवसापर्यंत राहील व तांत्रिक खंड देऊन गरजेनुसार पुढे चालु ठेवता येईल.

२. सदरील पदावर कंत्राटी स्वरुपात कार्यरत उमेदवारास भविष्यात सदर पदावर कायमस्वरुपी नेमणुकीचा कोणताही हक्क राहणार नाही.

३. सदर नियुक्ती कंत्राटी तत्वावर तात्पुरती असल्याने कोणतीही नोटीस अथवा कारण न देता उमेदवाराची सेवा समाप्त करण्यात येईल. तसेच सेवा समाप्त झाल्यावर त्यांना कोणत्याही न्यायालयात नेमणुक संबंधित दावा करण्याचा हक्क राहणार नाही. अथवा शासनाकडे अर्ज करता येणार नाही.

४. सदर कालावधीमध्ये काम असमाधनकारक आढळल्यास उमेदावारास कोणतीही पुर्वसुचना न देता सेवा तात्काळ समाप्त करण्यात येईल.

५. अधिष्ठाता कार्यालयातुन वेळोवेळी निर्गमित होणारे आदेश उमेदवारास बंधनकारक राहतील.

६. उमेदवारांना अन्य शासकीय कर्मचा-याप्रमाणे सार्वजनिक सुटटयांचा लाभ मिळेल.

७. उमेदवारांना म.ना.से. नियम १९८१ लागु राहणार आहे.

८. निवृ-ती वेतन, गटविमा योजना, एनपीएस योजना या सारखे व इतर कोणतेही लाभ उमेदवारास मिळणार नाही.

९. रिक्त पदांची संख्या वेळेवर कमी अधिक होऊ शकते. सदरील पदासाठी किमान वयोमर्यादा १८ वर्षे पुर्ण इतकी असुन कमाल वयोमर्यादा ही ३८ वर्षे पुर्ण इतकी राहील.

१०. मा. आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांनी वरील नियमित रिक्त पदे बदलीने अथवा सरळसेवेने भरल्यास सदर आदेश आपोआप संपुष्टात येतील.

११. उमेदवारांची सेवा कोणतेही कारण न देता मुदतीपुर्व समाप्त करण्याचा अधिकार संस्थाप्रमुखांना राहील. तसेच कंत्राटी काळात सेवामुक्त व्हावयाचे असल्यास १ महिन्याची आगाऊ सुचना किंवा १ महिन्याचे वेतन भरुन उमेदवाराला कार्यमुक्त करण्यात येईल.

१२. उच्च गुणव-ताधारक व आवश्यक क्षेत्रातील अनुभव असलेल्या उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल.

१३. उमेदवाराचे नियमानुसार आवश्यक असल्यास एम.एन.सी. रजिस्ट्रेशन झालेले असले पाहिजे.

१४. उमेदवाराने कोणतीही चुकीची माहिती दिल्याचे उघडकीस आल्यास त्याची नियुक्ती रद्द करण्यात येईल.

१५. उमेदवाराला मराठी, हिंदी व इंग्रजी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे.

१६. वरीलप्रमाणे मुलाखतीसाठी उमेदवाराला स्वखर्चाने हजर रहावे लागेल. मुलाखतीसाठी पत्राने कळविण्यात येणार नाही.

१७. उमेदवाराने अर्ज ए-४ आकाराच्या को-या कागदावर करावयाचे असुन त्यामध्ये खालील बाबी अंतर्भुत असणे आवश्यक आहे.

अ) अर्ज केलेल्या पदाचे नाव आ) अर्जदाराचे नाव व सही इ) स्वत: चा संपुर्ण प-ता ई) दुरध्वनी मोबाईल क्रमांक उ) शैक्षणिक अर्हता ऊ) कामाचा अनुभव - संस्थेचे नाव, अनुभव कालावधी ए) शैक्षणिक अर्हतेची कागदपत्रे, संबधित प्रमाणपत्रे, अनुभव प्रमाणपत्र.

१८. सदर जाहिरातीमध्ये कोणताही बदल अथवा रदद करण्याची किंवा कोणत्याही वेळी निवड यादी रदद करण्याचे अधिकार मा. अधिष्ठाता यांना राहतील.

**नियुक्त उमेदवारांना तात्काळ सोमवार दि.२०.०३.२०२३ रोजी पासुन कर्तव्यावर हजर व्हावे लागेल. रुजु होण्याकरिता कालावधी मिळणार नाही यांची कटाक्षाने नोंद घ्यावी.**

GOVT. MEDICAL COLLEGE LATUR

अधिष्ठाता
विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय
OIC महाविद्यालय, लातूर.
7/3/2023

**सदर जाहिरात संस्थेच्या** Website - http://www.vdgmclatur.org **वर प्रसिध्द करण्यात आली आहे.**

प्रत- मा. आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.

**अधिष्ठाता**
विलासराव देशमुख शासकिय वैद्यकीय
महाविद्यालय, लातूर